

भा. पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे,

**ग्रामीण विकास अध्ययन केंद्र व समाजकार्य आणि संशोधन संस्था अहमदनगर.**

**समाजकार्य प्रशिक्षणार्थी**

**अश्विनी रमेश सुतार (द्वितीय वर्ष)**

**पर्यवेक्षक**

**प्रा. आसावरी झापके मॅडम**

प्रा. आसावरी झापके मॅडम

**शोध निबंध शीर्षक**

**दह्याले समुदायात कोविड -१९ लसीकरण बाबत समज- गैसमज बद्दल अध्ययन**

विषय – दह्याले समुदायात कोविड-१९ लसीकरण बाबत समज गैरसमज बद्दल अध्ययन

प्रस्तावना –

कोरोना विषाणू हा एक संसर्गजन्य आजार या आजाराने संपूर्ण जगात थैमान घातले आहे. डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या वुहान शहरामध्ये हा विषाणू आढळून आला. या आजारास जागतिक संघटनेने कोविड १९ असे नाव दिले.

भारत देशात १६ जानेवारी पासून लसीकरण मोहिमेस सुरुवात झाली. कोविड-१९ च्या विरुद्ध भारताकडे सध्या दोन लस उपलब्ध आहेत.

पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील दह्याले गावाची लोकसंख्या १३४८ इतकी असून त्यापैकी ७८१ लोकांपर्यंत पोहचून कोविड १९ लसीकरण बाबत समज गैरसमज दूर केले.

- उद्देश
- 
- १. दह्याले समुदायातील कोविड १९ लसीकरणाची परिस्थीती समजून घेणे.
- 
- २. दह्याले समुदायातील लशिकरणाविषयी लोकांचे समज गैरसमज दूर करणे.
- 
- ३. कोविड १९ लशिकरणाबाबत असणारी माहिती, जागरुकता व सामाजिक वर्तनात झालेले बद्दल यांची नोंद करणे.
- 
- ४. दह्याले समुदयात कोविड १९ च्या लशिकरणामुळे निर्माण झालेले आव्हाने शोधून याबाबत समाजकार्य करण्यासाठी शिफारशी करणे.

अध्ययन पद्धती :-

सदर अध्ययन करीता वर्णनात्मक अध्ययन पद्धतीचा अवलंब केला आहे, कारण त्यादवारे समाजकार्य प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनीने विषयासंबंधितचे वास्तविक वर्णन केले आहे. अध्ययननासाठी दहयाले ता. डहाणू, जि. पालघर हे परिक्षेत्र निवडण्यात आलेले आहे एकूण १३४८ लोकसंख्या पैकी ७८१ व्यक्तीचे अध्ययन केले आहे.

प्रश्नावली :-

१. लोकांना कोविड १९ लसीकरण बाबत माहिती व ज्ञान किती आहे?
२. कोविड १९ लसीकरण बद्दल लोकांचा दृष्टीकोन कसा आहे?

वैयक्तिक चर्चा :-

कोविड १९ लसीकरण बाबत समज गैरसमज जाणून घेण्यासाठी ५६ लोकांसोबत वैयक्तीक चर्चा केली.

गृह भेटी:-

कोविड १९ लसीकरण बाबत जनजागृती करण्यासाठी समुदायातील एकूण ६७ कुटुंबांना भेटी दिल्या.

## हस्तक्षेप उपक्रमांची यादी

१) कोविड १९ लसीकरण शिबिरात सहभाग नोंदवून, आदिवासी समुदायातील एकूण ७८१ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले.

२) कोविड १९ चा प्रतिबंध व्हावा या उद्देशाने समुदायातील ९१ लोकांचे RT-PCR करण्यात आले.

३) कोविड १९ च्या संभाव्य तिसऱ्या लाटे बद्दल समुदायात विशेषत: महिला व बालकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती व्हावी या उद्देशाने समुदायात घेतला त्यामध्ये एकुण ५८ लोकांचा सहभाग होता.

४) गुंज संस्थेसोबत समन्वय साधून समुदायात एकूण ३८ कुटुंबांना मोफत मेडिकल किट वाटप केली.

५) कोरोणाच्या काळात समुदायातील एकूण १६ दुर्बल घटकांच्या घरी भेट देऊन समस्या जाणून घेतल्या व त्यातील ०४ लोकांना शासकिय योजना विषयी माहिती देऊन याचा लाभ मिळवून देण्यात आला.

## निरीक्षण

१) समुदायातील लोकांच्या मनात लस संदर्भात अनेक गैसमजूती होत्या.

२) लोकांना लस घेऊन प्रत्यक्ष बद्दल दिसून आले त्यावेळी अनेक लोक प्रेरित होऊन लस घेण्यास तयार झाले.

३) अनेक लोक लस घेत होते मात्र घरातील महिलांना लस घेण्यास नाकारत होते अशा परिस्थितीत जनजागृती करण्यात आली.

४) जनजागृती व समुपदेशन च्या माध्यमातून सकारात्मक बद्दल दिसून आले.

# निष्कर्ष

१) अल्प स्त्रियांनी कोविड-१९ लसीकरण घेतलेले आहे.

२) सर्वाधिक ८५% नागरीक हे आदिवासी समुदायाचे आहेत.

३) बहुतांश ७०% लोकांच्या मनात कोविड १९ लसीकरणबाबत समज गैरसमज होते.

४) सर्वाधिक लोकांच्या मनात कोविड १९ लसीकरण बाबत भीती दिसून आली.

# मूल्यांकन

दह्याले गावात कोविड लस संदर्भात खूप भीती व गैरसजुतीचे वातावरण होते परिणामी गावातील ३६ % लोकांनी लस घेतलेली होती त्यामध्ये २५ % पुरुष व उर्वरीत महिलांचा समावेश होता. त्यामुळे समाजकार्य प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनीने हस्तक्षेप करून दह्याले गावात कोविड लस संदर्भात जनजागृतीचा सकारात्मक परिणाम झालेला आहे. सद्य स्थितीत ७५% लोकांचे लसीकरण झालेले आहे. तसेच अनेक लोक इतरांसोबत बोलण्यासाठी सामाजिक अंतर राखून संवाद साधत आहे. ज्या पद्धतीने समाजकार्य प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनीने लस संदर्भात जनजागृती केली अगदी त्याच पद्धतीने ज्या लोकांनी लस घेतली ते लोक इतरांना योग्य माहिती सांगत आहे अशा प्रकारे या मार्गदर्शनाचा फायदा झालेला दिसून येतो.

# THANK YOU